# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-२९ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ७ एप्रिल ते १३ एप्रिल २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


## धार्मिक कार्यक्रमांसह वाहन रॅली, अन्नदान, भजन, कीर्तनाने शहर झाले भक्तिमय; श्रीराम जन्मोत्सव जल्लोषात साजरा







**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

जय श्रीरामांच्या जयघोषात शहरात रविवारी (दि.६) राम जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. विविध धार्मिक कार्यक्रमांनी प्रभू रामांचा जन्म सोहळा रामभक्तांनी जल्लोषात साजरा केला. राम नवमीनिमित्त शहरातील किराडपुरा येथील राममंदिरासह शहरातील सर्व राममंदिरांमध्ये सकाळपासून रामभक्तांची गर्दी दिसून आली.

रामनवमीनिमित्त शहरात रविवारी घरोघरी तसेच मंदिरांमध्ये मबोलो सियावर रामचंद्र कि जयफ चा जयघोष ऐकू येत होता. शहरातील किराडपुरा राम मंदिर तसेच उस्मानपुरा येथील राममंदिर, समर्थनगर राम मंदिर, कुंभारवाडा येथील श्री राम मंदिरात राम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंदिरांसह विविध कॉलनीमध्ये रामभजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. मंदिरांमध्ये रामांची महाआरतीही करण्यात आली. तसेच भाविकांना अन्नदान करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. शहरात श्रीराम मंदिर, टिळक पथ, श्रीराम मंदिर चौराहा, श्रीराम मंदिर, जय विश्वभारती कॉलनी, श्रीराम मंदिर राजनगर, श्रीराम मंदिर तुलसी भवन, पदमपुरा श्रीराम मंदिर, कैलासनगर श्रीराम मंदिर, समर्थनगर श्री काळाराम मंदिर, समर्थनगर श्रीराम भक्त हनुमान मंदिर व प्रल्हाद महाराज उपासना केंद्र, सातारा परिसर, श्रीराम मंदिर मीरा नगर पडेगाव, श्रीराम मंदिर हसूल, श्रीराम मंदिर, इटखेडा श्रीराम मंदिर, एन-४, सिडको, श्रीराम मंदिर बजाजनगर, श्रीराम मंदिर



दीपनगर हडको, श्रीराम मंदिर सातारा परिसर, श्रीराम मंदिर रामदरबार, सेंच्युरीप्राईड पन्नालालनगर, श्रीराम मंदिर एन-१ काळा गणपती मंदिरमागे सिडको एन-१ परिसर या विविध मंदिरातही रामजन्मोत्सवउत्साहात साजरा करण्यात आला. शहरात रामनवमीचा जल्लोष दिसून आला. विविध ठिकाणी ३० हून अधिक मि रवणुका निघाल्या. सुमारे २५ हून अधिक मंदिरांत दुपारी श्रीराम जन्मोत्सव भक्तीभावाने साजरा करण्यात आला. किराडपुरा येथील श्री बालाजी ट्रस्टच्यावतीने श्रीराम मंदिरामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत दुपारी १२ वाजता रामजन्म झाला. यानिमित्त भव्य मंडप उभारण्यात आला होता. गुढीपाडव्यापासून येथे दररोज ३ ते ५ या वेळेत दुपारी महिला मंडळांची भजने झाली. श्रीराम जन्मावर हभप प्रभाकर बोरसे यांचे सकाळी ९.३० ते ११.१५ या वेळेत कीर्तन झाले. दुपारी १२ वाजता अध्यक्ष मानसिंग पवार व मान्यवरांच्याच्या उपस्थितीत आरती झाली. यानंतर भंडारा झाला.

**संस्थान गणपती शोभायात्रा** - श्रीराम नवमी महोत्सव २०२५ तर्फे शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. मुख्य मिरवणूक संस्थान गणपती मंदिर ते कुंभारवाडा राम मंदिर गुलमंडीपर्यंत ही शोभायात्रा निघाली. रविवारी संध्याकाळी चार ते रात्री उशिरापर्यंत ही शोोभायात्रा होती. यावेळी परिसरातील रामभक्त सामील झाले होते. आरतीला राजकीय नेत्यांची उपस्थिती शहरातील सर्वात मोठे मंदिर म्हणून किराडपुराकडे पाहिले जाते. येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने रांगा साजरा लावल्या. सकाळी पुजारी विकास राम पालकर यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. त्यानंतर दुपारी बारा वाजता आरती करून जय श्रीराम, असा जयघोष करण्यात आला. यावेळी पोलिस आयुक्त प्रवीण पवार, मंत्री अतुल सावे, खा. भागवत कराड, माजी खा. चंद्रकांत खैरे, शिरीष बोराळकर, अनिल मकरिये, पृथ्वीराज पवार, बंडू ओक, मानसिंग पवार, दयाराम बसैये, उत्तमराव मनसुटे, शिवाजी दांडगे, बापू घडामोडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात न्हाहून निघाला. यावेळी हजारो भाविकांनी रामनवमीनिमित्त दुपारपर्यंत दर्शन घेतले. यावेळी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी तब्बल बारा क्विंटल बुंदीचा प्रसाद बनविण्यात आला. तसेच यावेळी मंदिरात रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी दत्ताजी भाले रक्तपिढीने सहकार्य केले. यावेळी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी मंडपची व्यवस्था करण्यात आली. पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यात आली.

किराडपुऱ्याला छावणीचे स्वरूप - दोन वर्षापूर्वी झालेल्या दंगलीच्या पार्श्वभूमीवर किराडपुरा भागाला छावणीचे स्वरूप आले होते. श्रीराम नवमीच्या पाश्र्श्वभूमीवर पोलिसांनी यंदा अधिक सावधगिरी बाळगल्याचे दिसून आले. शहरातील एकूण १४ राम मंदिरांमध्ये जन्मोत्सव साजरा करण्यात आला. किराडपुऱ्यातून निघालेल्या शोभायात्रेत १३ फुटांचे श्रीरामप्रभू, १२ फुटांचे लक्ष्मण आणि १० फूट उंचीच्या सीतामातेची मूर्ती आणि १० फूट उंचीची श्रीहनुमानाची भव्य दिव्य मूर्ती सर्वांचे आकर्षण ठरली.

**गुप्तचर यंत्रणेकडून पाळत** - गुप्तचर यंत्रणाही मिरवणुकांवर संघटनांसह कार्यकत्यांच्या हालचालींवर नजर ठेवून होती. समर्थ राम मंदिरात जन्मोत्सवानिमित्त सकाळी १० वाजता गणेश बुवा रामदासी महाराज यांचे कीर्तन झाले. किराडपुरातील श्रीराम मंदिरात सकाळी साडेनऊ वाजता हभप प्रभाकर बोरसे महाराज यांचे कीर्तन झाले.

## लातूर महापालिका आयुक्तांचा आत्महत्येचा प्रयत्न

**लातूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी आपल्या शासकीय निवासस्थानी रिव्हॉल्वरमधून स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आत्महत्येचा प्रयत्न करण्याचे कारण अद्याप समजलेले नाही.

गोळी डोक्यातून आरपार गेली असल्यामुळे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांची प्रकृती गंभीर आहे. सध्या आयुक्तांवर लातूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्या निर्देशांनुसार वरिष्ठ पोलीस अधिकारी तपास करत आहेत. लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांचा आत्महत्येचा प्रयत्न करण्याआधीच्या काही तासांत कोणाकोणाशी संपर्क झाला आणि काय बोलणे झाले हे जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी नेमक्या कोणत्या कारणामुळे निराश होऊन टोकाचे पाऊल उचलले हे जाणून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे.आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी यापूर्वी जालना, धाराशिव, नांदेड या नगरपरिषद महानगरपालिकांमध्ये अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यांनी लातूर महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून कार्यरत असताना टोकाचे पाऊल उचलले आहे.

## अमेरिकेच्या टॅरिफ धोरणाला शेअर बाजाराचा प्रतिकूल प्रतिसाद, जगभर मार्केट कोसळले

नवी दिल्ली : अमेरिकेने भारतासह जागातील अनेक देशांमधून आयात केल्या जाणाऱ्या मालावर टॅरिफ लागू केला आहे. या निर्णयाचा जगभरातील शेअर बाजारांवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसत आहे. नव्या आठवड्याची सुरुवात शेअर बाजार कोसळून झाली आहे. सुरुवातीच्या व्यवहारात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ३० पैशांनी घसरून ८५.७४ वर पोहोचला. तसेच सुरुवातीच्या व्यवहारात सेन्सेक्स ३,९३९.६८ अंकांनी घसरून ७१,४२५.०१ वर पोहोचला; निफ्टी १,१६०.८ अंकांनी घसरून २१,७४३.६५ वर पोहोचला.

टॅरिफबाबत अमेरिकेने घेतलेल्या निर्णयानंतर अनेक देशांच्या शेअर बाजारांमध्ये दहा ते पंधरा टक्क्यांपर्यंत घट झाल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी प्रतिक्रिया मागितली असता, टॅम्प यांनी चकीत करणारी प्रतिक्रिया दिली. मला काहीही बिघडू द्यायचे नाही. पण काही वेळा आजारावर उपचार करण्यासाठी दिलेल्या औषधांचा सुरुवातीला प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते; असे ट्रम्प म्हणाले.

जगभर फार्मा, आयटी आणि ऑटो क्षेत्रातील शेअरमध्ये मोठ्या प्रमाणात घसरण सुरू आहे. ऑस्ट्रेलियाच्या शेअर बाजारात ६ टक्क्यांहून अधिक घसरण दिसून येत आहे, तर दक्षिण कोरियाच्या बाजारात ५ टक्क्यांनी आणि जपानच्या बाजारात १० टक्क्यांहून अधिक घसरण दिसून आली आहे. चीनचा बाजार १० टक्क्यांनी घसरला आहे, तर हाँगकाँगचा बाजार १० टक्क्यांहून अधिक घसरला आहे. बाजारात आणखी १५ ते २० टक्क्यांच्या घसरणीची भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

टॅरिफमुळे अमेरिकेत महागाई वाढेल. अमेरिकेसह जगभर मंदीची लाट येईल, अशी भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या या भीतीचाही शेअर बाजारावर परिणाम झाला आहे.

अमेरिकेने भारतातून आयात केल्या जाणाऱ्या मालावर २६ टक्के टॅरिफ जाहीर केला आहे. हे करताना अमेरिकेतील कारखान्यात तयार होणाऱ्या पक्क्या मालासाठी आवश्यक कच्चा माल म्हणून येणाऱ्या अनेक भारतीय वस्तू तसेच अमेरिकेसाठी महत्त्वाच्या असलेल्या भारतीय वस्तू यांना टॅरिफमधून सवलत देण्यात आली आहे. आता अमेरिका भारताला द्यायच्या सवलतीत आणखी वाढ करण्याचा विचार करत आहे.

# !!! सूर्यनारायणाचा वाढता प्रकोप, सावधान !!!

**उन्हाळ्यातील कडक ऊन त्वचेसाठी खूप हानिकारक आहे. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे आपल्या त्वचेला सनबर्न, टॅनिंग आणि मुरुमांसारख्या समस्या उद्भवू लागतात. उन्हामुळे आपला चेहराही कोरडा आणि निर्जीव दिसू लागतो. यंदा सन २०२५ साली खुप कडक उन्हाळा असण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. वाटते की सूर्यनारायण आग ओकत आहे की काय? त्यामुळे आपणच आपली काळजी घेणे इष्ट ठरणार आहे. खबरदारीचा इशारा देणारा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर लेख सेवेत... संपादक.**

यावर्षी एवढे भयंकर कडक ऊन पडत आहे. झाडांची कोवळी-ओली-हिरवी पाने दुपारी चिंबलेली दिसत आहेत. ऊन्हात फिरल्यास ऊन्हाचे असह्य चटके बसत आहेत. मागील मार्च महिन्यातच असे हाल होते. गर्दीचे रस्ते निर्जन दिसत असत. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याची चिंता प्रत्येकांनी स्वतःच घेणे अत्यावश्यक वाटत आहे. आता एप्रिल अखेर आणि मे महिन्यातील तापमानाची तीव्रता यंदा मार्च महिन्यापासूनच जाणवायला लागली. तापमानाने चाळीशी पार केली असून राज्यात उष्णतेची लाट भडकली आहे. अधेमध्ये अवकाळी पाऊसही धुमाकूळ घालत आहे, मात्र उष्णता नावालाच कमी होत आहे. उष्माघात म्हणजे उष्णतेचा आघात होय. इंग्रजीत त्याला सनस्ट्रोक म्हणतात. या व्याधीत सुरुवातीला चक्कर, डोकेदुखी, मळमळ-उलटी, पोटात वेदना, गोंधळलेली अवस्था ही सामान्य लक्षणे रुग्णामध्ये पहायला मिळतात. याकडे दुर्लक्ष केल्यास जीवही गमवावा लागतो. जास्त वेळ उन्हात काम केल्याने शारीरिक समस्या निर्माण होऊ शकते. त्यातील गंभीर प्रकार म्हणजे उष्माघात- हिट एक्झॉशन आणि उष्माघात- हिट स्ट्रोक होय. सतत कडाक्याच्या उन्हात काम केल्यानंतर उष्माघात होतो. त्यातून होणारी तीव्र समस्या म्हणजेच उष्माघात होय. शरीराने मर्यादेपेक्षा जास्त उष्णता निर्माण केली किंवा उष्णता शोषून घेतली तर हायपरथर्मिया म्हणजेच अतिउच्च तापमानाचा आजार होतो. उष्माघात हा त्याचाच एक प्रकार आहे. बाहेरचे तापमान प्रमाणाबाहेर वाढले की शरीरातील तापमान नियंत्रित करण्याची यंत्रणा कोलमडते. ऊन आणि गरम हवेच्या झोतामध्ये काम करावे लागले किंवा तीव्र उष्णतेच्या संपर्कात गेल्यास शरीरातील तापमान नियंत्रित करणारी हायपोथॅलॅमसमधील यंत्रणा कोलमडून पडते आणि उष्माघात होतो.



उष्माघात होण्याचे नेमके कारण म्हणजे शरीरातून बाहेर पडणाऱ्या उष्णतेहून शोषलेली उष्णता अधिक असते. यामुळे शरीराचे तापमान वाढते. उष्माघात झाल्यानंतर तातडीची वैद्यकीय सेवा मिळाली नाही तर मृत्यू ओढवतो. उष्माघात आणि ताप येणे या भिन्न प्रक्रिया आहेत. ताप येण्यामध्ये शरीराचे तापमान नेहमीहून अधिक राहते. व्याख्येप्रमाणे उष्माघात म्हणजे शरीराचे तापमान ३८.१ पेक्षा अधिक किंवा त्याहून अधिक तापमानाला स्थिर राहणे. सामान्यपणे दुपारी शरीराचे तापमान ३७.७० सेल्सिअस असते. उष्माघातामध्ये हे तापमान ४० सेल्सिअस होऊन ते जीवघेणे ठरते.

जास्त तापमानामुळे शरीरातील महत्त्वाचे अवयव निकामी होतात. उष्माघात हा प्रामुख्याने अर्भकं, लहान मुलं, वयोवृद्ध, पाणी कमी पिणारे लोक, दीर्घ आजारी किंवा मद्यप्राशन करणाऱ्यांमध्ये आढळतो. तसेच हृदयरोग, फुप्फुसांचे आजार, मूत्रपिंडाचे आजार, लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह, मानसिक व्याधीसारख्या आजारांनी त्रस्त व्यक्तींनाही सहज उष्माघात होऊ शकतो. खेळाडूंना आणि बराच वेळ आउटडोअर काम करणाऱ्यांना उष्माघात होऊ शकतो. उष्माघाताची कारणे- अधिक प्रमाणात जंक फूड खाणे, आपल्याला घराबाहेर पडताच काहीतरी खायची इच्छा होते. उन्हात तर बाहेरचे अधिकच खात असतो. यामध्ये जंक फूडचे प्रमाण अधिक असते. यामुळे उष्माघात आणि उष्मा, थकवा देखील होऊ शकतो. काही जंक फूडमध्ये मोनोसोडियम, ग्लूटामंट्ससह गरम आणि हानिकारक पदार्थ असतात. याचे सेवन केल्याने शरीरातील उष्णता वाढवते. ज्यामुळे शरीर उष्माघाताचा सामना करू शकत नाही. शरीरातील पाण्याचा अभाव हे उष्माघाताचे एक प्रमुख कारण समजले जाते. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची अनेक प्रकरणे पाहिली जातात. भर उन्हात कमी पाणी पिऊन घराबाहेर पडले तर उष्माघात तर होईलच तसेच पाण्याच्या अभावामुळे होणाऱ्या अनेक रोगांचाही आपल्याला सामना करावा लागू शकतो. अशा परिस्थितीत नारळ पाण्याचे सेवन नक्की केले पाहिजे. आपल्याला कोणत्या ना कोणत्या कारणाने भर उन्हात बाहेर पडावेच लागते. सूर्याची तीव्र किरणे तोंड आणि शरीराच्या इतर भागांना स्पर्श करतात, तेव्हा उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. कामानिमित्त बाहेर निघाल्याने आपल्याला हे सर्व सोसावे लागते. उष्णता टाळण्यासाठी डोके, तोंड आणि हात हलक्या कपड्याने झाकून ठेवावे. शक्य असल्यास छत्रीसह घराबाहेर पडलेले बरे. आपणास थायरॉईडची समस्या असेल तर उन्हात उष्माघात होण्याची शक्यता जास्त असते. थायरॉईड असमतोल झाल्यावर रक्तदाब बदलल्यास थकवा जाणवतो. अशा परिस्थितीत उन्हात जाणे टाळावे. उष्माघाताची लक्षणे- उच्च ताप, कमी रक्तदाब, चक्कर येणे, उलट्या होणे, स्नायूंमध्ये कडकपणा, सतत घाम येणे, अशक्तपणा, त्वचेवर पुरळ, बेहोश होणे, डोकेदुखी, श्वास घेण्यास समस्या, भीती आणि अस्वस्थता.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

उष्माघातापासून बचाव असा करावा- उन्हात बाहेर निघणे टाळावे, उन्हात बाहेर पडताना छत्री वापरावी, उन्हाळ्यात चहा-कॉफी किंवा गरम पदार्थ टाळावे, शरीरात तापमान सामान्य राखण्यासाठी पाण्याची कमतरता येऊ देऊ नये, दिवसातून दोन ते तीन लीटर पाणी प्यावे, दीर्घकालीन काम टाळावे, उष्माघात झाल्यास डॉक्टरांना भेटावे, साखर असलेले पेय पिणे टाळावे, खुले व हलके कपडे घालावे, बाहेर पडण्यापूर्वी सनस्क्रीन आणि सनग्लासेस वापरावे, संतुलित आणि पौष्टिक आहार घ्यावे, जेव्हा तीव्र सूर्यप्रकाश असेल तेव्हा व्यायाम किंवा सायकल चालविणे टाळावे. अशाप्रकारे आग ओकणाऱ्या सूर्यनारायणाच्या प्रकोपापासून आपण वाचू शकतो. अन्यथा बळी पडू यात मुळीच शंका नाही!

!! रखरखीत उन्हाळ्याच्या सावधगिरीच्या इशाऱ्यासह गरमागरम हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

## फुटबॉल खेळावा तशी लाथा बुक्क्यांची मारहाण; असले प्रकार खपवून घेणार नाही!

**बारामतीतील त्या घटनेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा संताप**

बारामती : बारामतीमधील एका हॉटेल मॅनेजरला काही जणांनी बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या घटनेची व्हिडिओ क्लिप सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, या घटनेची दखल राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी घेतली आहे. संबंधित घटना ही सीसीटीव्हीत कैद झाली आहे. अशा घटना वारंवार घडल्या तर आपण थेट मकोका लावू, असा इशारा अजित पवारा यांनी दिला आहे.

मी काय कायम तुमच्यासोबत नाही. काळाच्या पुढं काही करता येत नाही. पण काम करताना नीट करतो. त्यामुळे पुढची लोकं म्हणतील चांगलं काम केलं. परवा माझ्याकडे क्लिप आली. सीसीटीव्ही मध्ये रेकॉर्ड झालं. त्याच्यामध्ये एकाला मारहाण केली. कुत्र्याला जसं मारत असतील तस मारलं. फुटबॉल कसा खेळाला जातो तसा ते लाथा बुक्क्या मारत चालले होते. मी पोलिसांना सांगितलं, कोणीही असो त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. मी असलं अजिबात खपवून घेणार नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले. त्याचबरोबर असे काही गुन्हे लागतील की ते सतत अशे गुन्हे करत राहिले तर पुढे मोकका पण लागेल, असा इशारा अजित पवार यांनी दिला. तर मेहरबानी करा कोणीही कायदा हातात घेऊ नका, कोणी काही चुकीच कैलं तर पोलिसांकडून येऊन तक्रार करा असे आवाहन त्यांनी केलं. १४ तारेखेला घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे. संविधानाची ७५ वर्ष पूर्ण झाली आहे, तरी काहीकाही जण स्वतःच्या घरीची मालमत्ता असल्यासारखं एखाद्याला बदडून काढत आहेत. हे होता कामा नये. असे देखील अजित पवार यांनी यावेळी सांगितले. पालकांनी आपली मुलं काय करतात याकडे लक्ष ठेवावे – तुमची मुलं काय करताहेत कुठं चुका करताहेत हे पाहणं पालकांची नैतिक जबाबदारी आहे. ती जबाबादारी पालकांनी पार पाडवी मग मला मुंबईला फोन येतात. दादा चुकलं एकदा पोटात घ्या. आरं पोट फुटायला लागलं आणि काय म्हणतो पोटात घ्या, अशी मुश्किल टिपण्णी देखील अजित पवार यांनी यावेळी बोलताना केली. सांगणाऱ्याला पण लाज, लज्जा काही शरम काही कशी वाटत नाही. एवढे त्याला बेदम मारलं. यामुळे शिक्षा कठोर झाल्याशिवाय लोकांना त्याची किंमत कळत नाही, असे देखील ते म्हणाले.

## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव राजाबाजार जैन पंचायत मंदिरात बैठक संपन्न भ. महावीर जन्मकल्याण रौप्य महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी खंडेलवाल समाजाची वज्रमुठ



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव अंतर्गत राजाबाजार जैन पंचायत मंदिरात गुरुवारी झालेल्या बैठकीत तन-मन-धनाने सक्रियतेने रौप्य महोत्सव यशस्वी करण्याची खंडेलवाल समाजाने वज्रमुठ बांधली.

प्रारंभी अध्यक्ष महावीर पाटणी, स्वप्निल पारख, प्रतीक साहूजी, निलेश जैन, बाहुबली वायकोस, प्रमोद पाटणी,पचायत सचिव प्रकाश अजमेरा, विलास साहुजी, रवी मुगदिया, मुकेश साहुजी, संगीता संचेती, सारिका साहूजी, सविता लोढा, ललिता साखला, मनीषा भन्साळी, आदींच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन झाले. पचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी सक्रिय योगदानाबाबत माहिती देऊन यशस्वीतेचे आवाहन केले. रवी मुगदिया यांनी नवकार जाप संकल्पनेची माहिती दिली. विलास साहुजी यांनी उपक्रमाचा अभ्यासू आढावा घेतला. प्रमोद पाटणी यांनी उपक्रम सांगितले.

सांस्कृतिक कार्यक्रमाची माहिती मनीषा भन्साळी यांनी दिली. अनिल संचेती यांनी जितो उपक्रमाचे माहिती दिली.


मेघना बडजाते यांनी कचरा निर्मूलन, प्लास्टिक मुक्ती अभियानाची माहिती दिली संजय संचेती यांनी जुन्या पिढीचे योगदान सांगून पाठशाळेचे महत्व विषद केले. चंद्र सागर धर्मशाळेच्या राजकुमार गंगवाल श्रेणिक कासलीवाल यांनी व्याख्यानमालेची माहिती दिली. ॲड. यतीन ठोले यांनी समिती स्थापनेच्या पूर्व आठवणींना उजाळा दिला. सूत्रसंचालन सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले महोत्सव समिति पत्रिका व चंद्रसागर धर्म शाला चा ७५ व्याखान मालेचा पत्रिका विमोचन केले. यावेळी अरुण पाटणी, सतोश सेठी यतीन ठोले चदा कासलीवाल कीरन पहाडे संजय पापडीवाल जितेंद्र पाटणी, महावीर ठोळे, कविता अजमेरा चादमल सुराना , मीना पापडीवाल, मंजू पाटणी, आशा कासलीवाल, किरण पांडे, नीता ठोळे, कैलास कासलीवाल दिगबर क्षीरसागर प्रसाद पाटनी अमोल पुर्णेकर, नरेंद्र अजमेरा वृशब कासलीवाल मदनलाल अच्छा, राजेश मुथा, रमेश पाटनी कीरन गगवाल बापू कासलीवाल निरज बडजाते प्रमोद पाडे विनोद बोकडिया, सुराणा डॉ. शैलेश चांदीवाल राखी गगवाल महावीर सेठी आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अन्नदान, महारक्तदान, रथयात्रा, ध्वजारोहनाने महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा होणार



**छत्रपती संभाजीनगर (अटूल मत प्रतिनिधी)**

सकल जैन समाज अंतर्गत भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव समिती २०२५ च्या तत्वधानामध्ये १० एप्रिल रोजी भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त विविध धार्मिक,सामाजिक व सांस्कुतिक कार्यकम तसेच अन्नदार, महारक्तदान, रथयात्रा, ध्वजारोहनाने महावीर जन्मकल्याणक महोत्सव प्रारंभ होणार असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली.



भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवासाठी सकल जैन समाजाचे साधु संत मोठया संख्येने उपस्थित राहणार असुन त्यामध्ये प.पु. प्रेममुनिजी मसा ठाणा-२, अर्केन्दुजीश्रीजी मसा, कल्पज्योतीश्रीजी मसा, शासनज्योतीश्रीजी मसा ठाणा-५, सिध्दीसुधाजी मसा आदीठाणा-३, हिमानीजी मसा आदीठाणा - ७, अमितसुधाजी मसा, नमीताजी मसा ठाणा - २, प्रभाजी मसा ठाणा ७, आदी साधुसंताच्या उपस्थितीत महावीर जन्म कल्याणक साजरा होणार आहे. सकल जैन समाजाचे सन्माननीय अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या अध्यक्षतेखाली व सर्व ६ पंथ मिळुन महावीर जन्म कल्याणक एकत्र साजरी २००० पासुन एकत्रित साजरी करीत आहोत हे वर्ष रौप्य महोत्सव वर्ष म्हणुन साजरे करत आहे. या वर्षीची टॅग लाईन जी ठेवण्यात आली आहे ती २५ साल बेमिसाल अशी ठेवण्यात आली आहे. शोभायात्रेत पुरफषांनी पांढरे वस्त्र तर महिलांनी केशरी व पिवळया रंगाच्या साडया परिधाना कराव्यात तसेच दिनांक ०६ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता नमो परिवाराच्या वतीने शासनस्पर्श संगीतभक्तीसंध्या कार्यकम आयोजीत करण्यात आला आहे. दिनांक ७ रोजी महावीर इंटरनॅशनल मेट्रो सिटी तर्फे ग्रिन मॅटचे वितरण होणार आहे. तसेच ८ एप्रिल रोजी बेबी किटचे वितरण छोटी घाटी येथे होणार आहे. तसेच चंद्रसागर धर्मशाळा शहागंज येथे भगवान महावीर व्याख्यान माला आयोजीत करण्यात आली आहे. यासाठी सतिशजी शर्मा हे व्याख्यानमालेत उदबोधन करणार आहेत. तसेच ९ एप्रिल रोजी विश्श्वनवकार महामंत्र दिवस निमीत्त सामुहिक जापचे आयोजन करण्यात आले आहे. सकल जैन समाज व भगवान महावीर रसोई घर जैन अलर्ट ग्रुप अंतर्गत १ एप्रिल ते १० एप्रिल पर्यत घाटी येथे गरजुंना अन्नदान सुरू आहे.

सर्व प्रथम सकाळी ६ वाजता मुख्य वाहन रॅली राजाबजार जैन मंदिर,महावीर भवन,विमलनाथ जैन मंदिर, सराफा, टि.व्ही.सेंटर, चिकलठाणा, शिवाजीनगर, दशमेशनगर, रेल्वेस्टेशन, पंढरपुर, वाळुज, पुंडलिकनगर, सिडको एन ९,एम.जी.एम.जैन विदयार्थी,गारखेडा,छावणी,चित्तेगांव,जैन रायडर्स आदी शहरातुन युवक युवती व संस्थाव्दारा भगवान महावीर स्तंभावर ध्वजरोहन हेतु महावीर उडडाणपुल येथे उपस्थित राहणार आहे.

## २५ साल बेमिसाल
### साधुसंतांची उपस्थिती
### महारक्तदान शिबीर
### घाटी येथे गरजुंना अन्नदान

तदनंतर सकाळी ७ वाजता सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा व महासचिव महावीर पाटणी यांच्या मार्गदर्शनाखाली व जन्म कल्याणक महोत्सव समितीचे अध्यक्ष स्वप्नील पारख,कार्याध्यक्ष प्रतिक साहुजी, संगीता संचेती, महासचिव निलेश जैन, सारीका साहुजी, कोषाध्यक्ष बाहुबली वायकोस,मिठालाल कांकरीया, ललीता साकला,मिना पापडीवाल, कार्यकम संयोजक पंकज साकला,डिंपल पगारीया,मनिषा भंसाली, सचिव प्रमोद पाटणी , सहसचिव मंजु पाटणी, मिनाश्री उदगीरकर, अनिता पहाडे, वैशाली धोगडे, सकल जैन समाजाच्या मान्यवरांच्या हस्ते भगवान महावीर चौक येथे धर्मध्वजारोहन होईल तदनंतर ७.१५ वाजता उत्तमचंद जैन छात्रालय येथे ध्वजारोहन होईल तदनंतर गरूगणेशनगर येथे ध्वजारोहन होईल तसेच सकाळी ८ वाजता पैठणगेट येथुन भव्य रथयात्रा प्रारंभ होईल.

तसेच रथयात्रेमध्ये शंखेश्श्वर पाशर्श्वनाथ जैन मंदिर सिडको,गोडीजी पाशर्श्वनाथ जैन मंदिर जोहरीवाडा,विमलनाथ जैन मंदिर जाधवमंडी यांचे रथ शोभायात्रेत राहणार आहे तसेच राजाबजार जैन मंदिर,सराफा व हडको जैन मंदिर, सकल सैतवाल दिगंबर जैन समाज या मंदिराची पालखी शोभायात्रेत राहणार आहे. हि शोभायोत्रा पैठणगेट, टिळकपथ, मछलीखडक, सिटीचौक, शहागंज,गांधीपुतळा,राजाबजार मार्गाने जैन मंदिरात भगवंताचा महामस्तकाभिषेक होईल तसेच भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समिती,महावीर मेडिकल फाउफंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने १० एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी २ पर्यत महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमीत्त महिला समितीव्दारा झाकीयॉ,सजिव देखावा ठेवण्यात आला आहे. संपुर्ण कार्यकम हा सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा , महासचिव महावीर पाटणी,विकास जैन, प्रशांत देसरडा, झुंबरलाल पगारिया,अनिलकुमार संचेती,कौशीक सुराणा, मुकेश साहुजी,अमोल पुर्णेकर, रतिलाल मुगदिया, अॅड.डी.बी.कासलीवाल, डॉ.प्रकाश झांबड विलास साहुजी,संजय संचेती,रवि मुगदिया,मदनलाल आच्छा,वृषभ कासलीवाल, विनोद बोकडिया,निलेश सावलकर, भारती बागरेचा,राजेश मुथा, निलेश पहाडे, करफणा साहुजी, भावना सेठीया, मंगल पारख, कविता अजमेरा, मधु जैन, मेघा सुगंधी, प्रकाश अजमेरा, इंदरचंद संचेती, महेंद्र जैन, रफ्फराज सुराणा, आनंद दुग्गड, हर्षल साहुजी, प्रफुल्ल सोनटक्के, नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल, प्रशांत शहा यांच्यासह सकल जैन समाज बांधव परिश्रम घेत आहे. अशी माहिती प्रचार प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी एका पत्रकाव्दारे दिली.

# 'होप ऑफ हेलपिंग हॅन्ड सोसिअल फाउंडेशन ' तर्फे आरंभ ऑटिझ्म सेंटरला मदतीचा हात

**छत्रपती संभाजीनगर (अटूल मत प्रतिनिधी)**

होप ऑफ हेलपिंग हॅन्ड सोसिअल फाऊंडेशन ही धर्मादाय अंतर्गत चालणारी सामाजिक संस्था गेल्या तीन वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. या संस्थेतर्फे यावेळी आरंभ ऑटिझम सेंटर येथे गरजू विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात पुढे करण्यात आला.

संस्थेच्या वतीने आरंभ मध्ये वॉटर सोलार हिटर तसेच मुलांना चॉकलेट आणि नानकटाई बनवण्यासाठी मायक्रोवेव्ह ओव्हण प्रदान करण्यात आले. संस्थेने यापूर्वी अनेक समाजोपयोगी प्रकल्प राबवले आहेत, ज्यामध्ये वॉटर सोलर हीटर प्रकल्प महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प आधार वृद्धाश्रम, नारेगाव मतिमंद व अपंग . शाळा, बोरगाव दैवत वृद्धाश्रम आणि अन्य ठिकाणी राबवण्यात आला आहे. तसेच

या कार्यक्रमाच्या वेळी संस्थेच्या संस्थापक व अध्यक्ष तृप्ति चुडीवाल,, सचिव पायल गंगवाल, सहसचिव सोनल टाटीया कार्यकारिणी सदस्य वंदना गुजराती, प्रियंका बडजाते, पन्ना झवेरी, धनश्री जैन आणि रूपा गुजराती उपस्थित होत्या.

यासाठी आर्थिक सहकार्य आशिष ज़रीवाला (छ. संभाजीनगर/दुबई) यांनी केले. तसेच, जरीवाला कुटुंबातील रूपल देशपांडे प्रगती कपाडिया आणि डॉ. निशिता कपाडिया हे देखील कार्यक्रमास उपस्थित होते.

तसेच आरंभ चे सगळे कार्यकारी सदस्य हे देखील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळी आर्थिक मदत करणाऱ्या जरीवाला परिवाराचे विशेष आभार मानण्यात आले.

अध्यक्षा तृप्ति चुडीवाल यानी स्वतंत्र संदेश (प्रेसिडेंट स्टेटमेंट) 'होप ऑफ हेलपिंग हॅन्ड सोसिअल फाऊंडेशन ' ही संस्था समाजाच्या विविध स्तरांतील गरजू लोकांसाठी काम करत आहे. आम्ही केवळ मदतच करत नाही, तर त्यांना आत्मनिर्भर बनवण्यावर भर देतो. सौरऊर्जा हे पर्यावरणपूरक आणि दीर्घकाळ टिकणारे साधन आहे, आणि आम्ही गरजू ठिकाणी सोलर लाइट, सोलर वॉटर हीटर आणि इतर सौर ऊर्जा उपकरणे पुरवण्याचे काम करत आहोत. आरंभ ऑटिझम सेंटरसाठी मायक्रोवेव्ह आणि साइड फॅन्स प्रदान करणे हा आमच्या मिशनचा एक भाग आहे. भविष्यातही आम्ही असेच अनेक प्रकल्प राबवणार आहे.

# विश्व कल्याणासाठी सर्वांनी एकत्र यावे

## जितो परिवार, सकल जैन समाज आणि नवकार फाउंडेशनतर्फे आव्हान

**छत्रपती संभाजीनगर (अटूल मत प्रतिनिधी)**

भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव निमित्त विश्व कल्याणासाठी ९ एप्रिल २०२५ नवकार दिवस रोजी विश्व नवकार महामंत्र सामुहिक जाप चे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने शहर आणि जिल्ह्यातील जैन आणि अजैन सर्वांनी एकत्र येऊन हा दिवस साजरा करावा, असे आवाहन जितो परिवाराचे अध्यक्ष अनिल कुमार संचेती आणि मुख्य सचिव आशिष सकलेचा यांनी केले आहे.




सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगरतर्फे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त ९ एप्रिल रोजी विश्व नवकार जपाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम एस.बी. कॉलेजच्या प्रांगणात सकाळी ७ ते ९.३० पर्यंत होईल. कार्यक्रमात भक्तीगीते, दीप प्रज्वलन आणि साध्वीजींचे आशीर्वाद असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देखील नवकार पठण करून कार्यक्रमाची सुरुवात करतील. कार्यक्रमात ५४ लकी ड्रॉ आणि नवकारसीचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या २५ वर्षांपासून जैन समाजात असलेली एकता कायम ठेवण्यासाठी सर्व संप्रदायातील लोक एकत्र येऊन हा जप करतील. या कार्यक्रमाद्वारे छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक नवकार जप करून विश्वविक्रम करण्याचा संकल्प आहे. शहरातील सर्व नवकार उपासकांना या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन सकल जैन समाजाचे अध्यक्ष राजेंद्र दर्डा यांनी केले आहे. छत्रपती संभाजीनगर येथे ९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी सात ते साडेनऊ या दरम्यान शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी सरस्वती भवन महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवसानिमित्त भारतासह १०८ देश, १०० पेक्षा अधिक संस्था , राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, कलाकार, उद्योजक, धर्मगुरू, खेळाडू यांच्यासह असंख्य व्यक्ती आणि संस्था सहभागी होणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर येथील जितो लेडीज विंग, जितो युथ विंग, जैनम महिला मंच, अरिहंत ग्रुप, जयगुरु मिश्री मंडळ, परमेषठी ग्रुप, गुरु परिवार, नमो परिवार, युथ सोशल फोरम, गोल्डन ग्रुप, वर्धमान रेसिडेन्सी युवक ग्रुप, बाहुबली ग्रुप, दक्षिण मध्ये युवा ग्रुप, हडको गुरु भक्त परिवार, रॉकर्स ग्रुप, गुरुभक्त परिवार, सिडको रॉयल ग्रुप, जैन सोशल ऑर्गनायझेशन, स्वस्ति ग्रुप, आगम युवा ग्रुप, अखिल भारतीय जैन दिवाकर मंच, जैन कॉन्फरन्स युवा परिवार, आनंद युवक मंडळ, हडको, ओसवाल जैन ट्रस्ट, भारतीय जैन संघटना, जैन सोशल ग्रुप, संगिनी ग्रुप, १०८ गो सेवा ग्रुप, श्री जैन अलर्ट ग्रुप, पार्श्वधर्म महिला मंच, तेरापंथ युवका परिषद, जैन टॅग, त्रिशला महिला मंच, तेरापंथ कन्या मंडळ, संस्कार महिला मंच, पुलक मंच दि. जैन युवक मंडळ, राजाबाजार जैनम ग्रुप, जैन इंजी. सोसायटी, संगिनी ग्रुप, परमेठी युवक ग्रुप, राजाबाजार दि. जैन महिला मंडळ, जागर्स ग्रुप, मारवाडी ग्रुप, नवकार फाऊंडेशन, वैजापुर, पैठण, सिललोड, लासुर, गंगापूर येथील सकल जैन समाज यांचा सहभाग आहे.

विशेष सहकार्य - श्री वर्धमान श्वेतांबर स्थानकवासी जैन श्रावक संघ, श्री १००८ शांतीनाथ अग्रवाल दिगंबर जैन मंदिर ट्रस्ट, सराफा, हडको श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर, राजाबाजार, श्री छ. संभाजीनगर जैन श्वेतांबर मुर्तिपुजक श्री संघ, श्री आनंदजी कल्याणजी जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट, श्री जैन श्वेतांबर तेरापंथ सभा, छ. संभाजीनगर, श्री सकल सैतवाल दिगंबर जैन समाज. विश्व नवकार महामंत्र दिन हा महत्त्वाचा कार्यक्रम असून तो जैन समाजातर्फे आयोजित केला जाणार आहे. आत्मशुद्धी आणि आध्यात्मिक विकासाद्वारे जगाचे कल्याण करणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. हा कार्यक्रम सर्व समाजातील लोकांना जातीय अडथळे तोडून एकत्र आणेल आणि जगभर एकता आणि सद्भावनेचा संदेश देईल. हा कार्यक्रम जैन समाज आणि जीतो परिवाराच्या जगकल्याणाची दृष्टी लोकांपर्यंत पोहोचवण्याचे एक माध्यम बनेल.

### नवकार फाऊंडेशनतर्फे २७ नवकार कलशांच्या लकी ड्रॉची घोषणा

जितो छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष अनिल कुमार संचेती यांनी नवकार फाऊंडेशनचे प्रकल्प प्रमुख रवी मुगदीया आणि त्यांच्या संपूर्ण टीमला ९ एप्रिल रोजी विश्व नवकार दिनानिमित्त आयोजित नवकार महामंत्र जप अनुष्ठानात सहभागी होण्याची विनंती केली. या प्रसंगी, ३३६ कोटी नवकार जपांची नोंद करणारे नवकार फाऊंडेशन, छत्रपती संभाजीनगर यांनी सहभागी होण्याचे निमंत्रण दिले आणि या विश्व नवकार दिनाच्या कार्यक्रमात नवकार फाऊंडेशनचे विशेष सहकार्य राहील, ही मंगलभावना व्यक्त केली. तसेच ९ एप्रिलच्या सामूहिक नवकार जपाच्या अनुष्ठानात २७ नवकार कलशांच्या लकी ड्रॉमध्ये नवकार फाऊंडेशनकडून देण्याची घोषणा रवी मुगदिया यांनी केली. नवकार दिनाच्या निमित्ताने नवकार महामंत्र प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात येणार आहे. या विश्व नवकार दिनाच्या कार्यक्रमात आपण आपल्या कुटुंबासह आणि मित्र-परिवारासह सहभागी व्हावे, असे आवाहन नवकार फाऊंडेशनतर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आजच नोंदणी करा.www.navkardivas.jitoworld.org या लिंकला भेट द्या. कार्यक्रमाबद्दल अधिक माहिती आणि नोंदणी करण्याची संधी मिळवा.

# सम्राट अशोकाचे भारत बौद्धमयचे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय ध्वजात अशोक चक्र विराजमान करून पुर्ण केले- बागडे!



**नागपूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

या देशातील लोकांची मानसिकता अशी तयार झाली एकादयाच्या घरावर, गाडी वर शर्टावर अशोक चक्र दिसला तर हे बौद्धाचे आहे अशी समज झाली आहे परंतु देशाच्या राष्ट्रीय ध्वजावर अशोक चक्र आहे तर कोणीही असे म्हणत नाही हा देश बौद्धांच्या समतेचा प्रतिक आहे हि शोकांतिका आहे सम्राट अशोकाचे भारत बौद्धमय करण्याचे स्वप्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील राष्ट्रीय ध्वजावर अशोक चक्र विराजमान करून पुर्ण केले असे प्रतिपादन आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी केले.

ते आज सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेश उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे हे होते दलित पँथर चे जेष्ठ नेते जयदेव चिंवडे यांनी सम्राट अशोक यांच्या छायाचित्रावर पुष्पहार अर्पण केले राजीव कांबळे यांनी दिपप्रज्वलन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल गंगापूरकर यांनी केले. या प्रसंगी प्रामुख्याने मुन्ना ढोणे,पुणशिल रोहीत पांडे, अभिषेक मिश्रा, राहूल त्रिवेदी,रुबीना खान,तारा खान, मनोहर इंगोले,शालिक बांगर व मोठ्या संख्येने महिला पुरुष कार्यकर्ते उपस्थित होते.

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते इब्राहिम पठाण आयोजित सर्वपक्षीय सर्व धर्मीय ईद मिलन कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

हिंदू मुस्लिम भाईचारा सर्वपक्षीय सर्व धर्मीय ईद मिलन कार्यक्रम मौलाना आझाद कॉलेज समोर असलेल्या नॅशनल कॉलनी येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते इब्राहिम पठाण यांच्या निवासस्थानी संपन्न झाला आहे.

यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक मतदार संघातील आमदार विक्रम काळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अशोक जगताप, बेगमपुरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मंगेश जगताप जी, सुरजित सिंग जी मा. अध्यक्ष अल्पसंख्याक विभाग, मुस्लिम समाजातील एकबाल अन्सारी, बाबुराव कदम जी अध्यक्ष महाराष्ट्र RPI हाजी याखूब खान, नवीन सिंग ओबराय, महानगरपालिकाचे माजी गटनेते भाऊसाहेब जगताप, शिक्षण अधिकारी, एर वाहिद शेख, इरफान इब्राहिम पठाण, मोहम्मद जाकीर, मोईन कुरेशी, आमेर अब्दुल सलीम, शेख अथर मोईन इनामदार, अनिस पटेल, आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले ईद मिलानच्या कार्यक्रम जसे होत आहेत. तसेच सगळीकडे असेच कार्यक्रम व्हायला पाहिजे हा शहर हिंदू मुस्लिम एकतेच्या प्रतीक असलेला आहे.

येथे कोणताही अनुचित प्रकार घडलेल्या नसून सर्व समाजातील लोकांनी ईद शांततेत पार पाडली तसेच एकमेकांना इच्छा शुभेच्छा दिलेला आहे, यापुढेही असेच शहराचे वातावरण राहिले पाहिजे आपण सगळे मिळून एकत्रित येऊन असेच कार्यक्रम घ्यावे असे यावेळी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केलेले आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाहेद पठाण आदींनी यशस्वी केलेले आहे.

# भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव २०२५ पैठण कार्यकारीणी जाहिर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पैठण जैन समाज भगवान महावीर जन्म कल्याणकमोहत्सव समीतीच्या माध्यमातून ह्यावर्षी सर्वच प्रमुख पदावर युवकांची नियुक्ती केली असुन युवकांमध्ये उत्साह दिसत आहे. हया वर्षीचा जन्म कल्याणकमोहत्सव मागील वर्षापेक्षा चांगल्या प्रमाणात झाला पाहीजे नवनिर्वाचीत पदाधीकारी यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले शनी अरीष्ट निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान पैठण चे महामंत्री विलास पहाडे यांच्या अध्यक्षतेखाली मिटींग घेण्यात आली मीटींगमध्ये अभिजीत काला, कीशोर भाकरे विवेक काला सजय डेरे कपील पहाडे संयोग गंगवाल, प्रमोद पाटणी, राहूल पाटणी, वर्धमान पहाड़े, कैलास पाटणी, डॉ. राका,तारावंद शिगवी, महावीर भुस,अनुप पहाडे,स्वदेश पांडे, जितु पांडे जैन महीला





मंडळाच्या अध्यक्षा स्वाती बडजाते,रेखा कासलीवाल, निलम चांदीवाल, आदी उपस्थीत होते. भगवान महावीर जन्मकल्याणकम ोहत्सवाच्या अध्यक्षपदी अभिजीत कासलीवाल उपअध्यक्षपदी धीरज पाटणी सेक्रेटरी निखील शिंगवी यांची निवड करण्यात आली. महावीर जन्मकल्याणाकच्या दिवशी महाप्रसाद. प्रशांत, प्रतिक, प्राजक्ता गेगंजे (जैन) पैठण यांच्या तर्फे आहे.

# कृषीमंत्री माणिकराव कोकाटे वारंवार शेतकऱ्यांवर उपहासाने का बोलतात?

## बळीराजा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांचा सवाल

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे वारंवार शेतकऱ्यांवर उपहासाने बोलत आहेत . या अगोदर त्यांनी शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांशी केली होती. ज्यांची सेवा करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे त्यांचाच ते वारंवार अपमान करत आहेत . महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी दुष्काळ, अवकाळी पाऊस, पिकांच्या पडलेल्या किमती , वाढती कर्जे आणि वर्षानुवर्षे आत्महत्यांचे संकट सहन केले आहे . यासाठी ज्याच्याकडून सहानुभूतीची गरज आहे तोच उपहासाने वागत असेल तर येणार काळ मोठा कठीण असणार आहे .

किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किंमतीत शेतकरी विक्री करत आहेत, उत्पादन खर्च वाढत आहे . शेतकऱ्यांत कर्जबाजारीपणा आणि नैराश्य वाढत आहे , यामुळेच देशातील सर्वाधिक शेतकरी आत्म हत्या महाराष्ट्रात आहेत . याची थोडी तरी संवेदनशीलता नेतृत्वाला असायला हवी. मुळात हे तथाकथित कृषिमंत्री आणि इतर मंत्रिमंडळ हे मुख्यमंत्री – अर्थमंत्री यांनी ठरवलेल्या पॉलिसीचीच बाजू लावून धरत आहेत. यापूर्वीही माजी कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी शेतकरी आत्महत्यांना 'काही नवीन नाही' असे म्हटले होते. आपल्या शेतकऱ्यांची अशी थट्टा किती काळ चालणार आहे ? इतकी असंवेदनशीलता असलेली माणसे असल्यावर दुसरे काय होणार आहे ? असे कृषीमंत्री असतील तर येणारा काळ कठीण आहे, असे अखिल भारतीय बळीराजा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांनी सांगितले.

# छत्रपती संभाजीनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमितीच्या अध्यक्षपदी विजय मगरे यांची निवड

## कार्याध्यक्षपदी महेंद्र सोनवणे, उपाध्यक्षपदी संतोष भिंगारे तर स्वागतध्यक्षपदी चंद्रकांत हिवराळे यांची निवड

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

बोधिसत्व, प्रज्ञासूर्य, भारतरत्न, म हामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, छत्रपती संभाजीनगर शहर जिल्हा कार्यकारिणी समितीची बैठक महासमिती संस्थापक सदस्य ॲड. रमेशभाई खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी समन्वय समितीचे दिनकर ओंकार, राजू शिंदे, गौतम खरात, गौतम लांडगे, मिलिंद दाभाडे, रामभाऊ पेरकर, प्रकाश निकाळजे, बंडू कांबळे कृष्णा बनकर यांच्या उपस्थितत सर्वानुमते विजय मगरे यांची निवड करण्यात आली. मुख्य सल्लागार म्हणून मिलिंद दाभाडे, कार्याध्यक्षपदी महेंद्र सोनवणे, उपाध्यक्ष संतोष भिंगारे, स्वागताध्यक्ष चंद्रकांत हिवराळे, तर सम न्वयक पदी गौतम खरात, गौतम लांडगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती यंदा समाजाभिमुख विविध उपक्रमांनी येत्या १४ एप्रिल रोजी साजरी करण्यात येणार असून यानिमित्ताने विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती नवनर्वाचित अध्यक्ष विजय मगरे यांनी दिली.

छत्रपती संभाजी नगरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या छत्रपती संभाजी नगर शहरातील भीम जयंतीचा जन्मोत्सव सोहळा यावर्षी अविस्मरणीय ठरणार आहे. हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात क्रांती चौक येथे साजरा करण्यात येणार असल्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महासमिती चे नवनिर्वाचित अध्यक्ष विजय मगरे यांनी स्पष्ट केले.

सविस्तर कार्यकारीणी पुढील प्रमाणे :

अध्यक्ष : विजय मगरे, कार्याध्यक्ष महेंद्र सोनवणे, स्वागतध्यक्ष : चंद्रकांत हिवराळे, उपाध्यक्ष : संतोष भिंगारे, मुख्य सल्लागार मिलिंद दाभाडे, मुख्य समन्वयक : गौतम खरात, गौतम लांडगे, संस्थापक समिती : ॲड. रमेशभाई खंडागळे, दिनकर ओंकार, रामभाऊ पेरकर, राजू शिंदे, प्रकाश निकाळजे, कृष्णा बनकर, राजू आमराव, रुपचंद वाघमारे, भगवान रगडे, बंडू कांबळे. जालिंदर शेंडगे, राहुल सोनवणे. उपाध्यक्ष : राहुल सावंत, मुकुल निकाळजे, विनोद बनकर, कृष्णा भंडारे. कार्यालयीन सचिव : विजय वाहूळ, मिलिंद बनसोडे, डॉ. निलेश आंबेवाडीकर, कार्यकारिणी सदस्य : राहुल साळवे, दामूअण्णा कांबळे, भरत दाभाडे, संदीप जाधव, राजू भालेराव, भूषण हिवाळे, नाना म्हस्के, प्रकाश जाधव, मनोज जाधव, प्रकाश गायकवाड, माणिक साळवे, नंदू बनकर, बालाजी सूर्यवंशी, नागेश जावळे, डॉ. कुणाल खरात, संदेश शेळके. महिला कार्यकारिणी : रेखा राऊत, रेखा मुळे, विजया बनकर, प्रसिद्धी प्रमुख : सचिन लिला सुखदेव अंभोरे.

# अखिल भारतीय बळीराजा संघटनेच्या वतीने लवकरच आमरण उपोषण-निवृत्ती डक पाटील

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

विधानसभा निवडणुकीच्या अगोदर या सरकाकरणे जाहीरनामे काढले. शेतकरी कर्ज माफी करणार, सातबारा कोरा करणार, लाईट बिल म ाफ़ करणार, दुधाला अनुदान देणार परंतु सरकार स्थापन झाल्यावर सारे आश्वासने विसरले. शेतकरी हवालदिल झालाय आणि हें सरकार खासदाराऔचा पगार, भत्ते वाढवताय. हेच का यांचे शेतकरी प्रेम याच्या निषेधार्थ अखिल भारतीय बळीराजा संघटनेचे च्या वतीने मोठे कर्ज माफी जिल्हा अधिकारी कार्यलय समोर तीव्र निदर्शने करून आंदोलनाची उर्वरित भूमिका स्पष्ट केल्या जाईल व विभागीय आयुक्ताला निवेदन देऊन मुंबई मंत्रालय येथे संघटनेच्या वतीने आमरण उपोषण करण्यात यईल या आंदोलनामध्ये शेतकरी शेतमजूर कष्टकरी कामगार शुशित बेरोजगार यांच्या मोठ्या प्रमाणात सहभागी असणार आहे.



संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांनी या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि संघटनेच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यास प्रोत्साहन दिले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.